# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/08/2023 (गुरूवार) दुपार

---

## चोरी

**१) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०२ किमी अंतरावर रामटेक बस स्टॉप, ता. रामटेक येथे दि. २३/०८/२०२३ चे १४.४५ वा. ते १५.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. योगीता मनोहर साखरे, वय ४५ वर्ष, रा. लोंधीखेडा ता. सौंसर जि. छिंदवाडा ही आपले भावाकडे दिनांक २२/०८/२०२३ रोजी मंगळगौरीचा कार्यक्रम असल्याने लोंधीखेडा ता. सौंसर जि. छिंदवाडा येथुन एकटीच बसने रामटेक येथे आली होती. सदर कार्यक्रमात अंगावर घालण्याकरीता सोने सोबत आणले होते. सदरचे सोने हे फिर्यादीचे लग्नातील असुन २० वर्षापासुन फिर्यादीचे जवळच आहे. दि. २३/०८/२०२३ रोजी फिर्यादी ही लोधीखेडा गावाला जाण्याकरिता रामटेक बस स्टॉप येथे दुपारी ०१:१५ वा. दरम्यान आली तर ०२ तासापासुन बस नसल्याने नंतर फिर्यादी ही रामटेक सावनेर बस मध्ये चढली व बस मध्ये बॅग मधुन पाण्याची बॉटल काढण्यासाठी गेली असता फिर्यादीचे बॅगची चैन निघाली होती व बॅग मध्ये ठेवलेली सोन्याची डब्बी दिसुन न आल्याने आजु बाजुला शोध घेतला परंतु सोने ठेवलेली डब्बी दिसुन आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने डब्बी मध्ये ठेवलेले ०१) १३ ग्रॅम पोत किंमती ३२,०००/—रू. हजार २) २ ग्रॅमची नथ किंमती ५०००/— रू ३) ४ ग्रॅमची अंगुठी किंमती १०,०००/—रू ४) १ ग्रॅमची कानामधील रिंग किंमती २५००/— रू असा एकूण २० ग्रॅम सोने किंमती ४९,५००/— रूपयाचा मुद्देमाल चोरी करून घेवुन गेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत लांजेवार मो. नं. ९७६४१९०९५१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत ०४ किमी अंतरावर मौजा शिवाडौली येथे दि. २२/०८/२०२३ चे १८.०० वा. ते दिनांक २३/०८/२०२३ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— गणेश मोतीराम भलावी, वय ५० वर्ष, रा. हंसापुर हे गंगाधर निकम रा. कन्हान यांची मौजा शिवाडौली शिवारात ६० एकर शेती असुन त्याच्याकडे १५०००/—रू. दिवानजी म्हणुन काम करतो व शेतीवर देखरेख करतो. त्या शेतात ठेवलेले पाठबंधारे विभागाचे एकुण ३५ जुनाट तराफे किंमती २०,०००/— रू. कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक दत्ता बगमारे मो. नं. मो. नं. ७०३०१०९९६४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**